# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०७/२०१८

**१) मोटार सायकलची चोरी : –**

दिनांक १५/०७/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रमोद पुरुषोत्तम उराडे वय ३३ वर्ष, रा. अडयाळ आपली हिरो होन्डा मोटार सायकल क्र. एमएच ३६ क्यु १४१ किंमती २०,०००/–रु. ची वैभव मेडीकल समोर चाबी लागलेली ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहनांच्या धडकेत मुलीचा मृत्यु :–**

दिनांक १०/०७/२०१८ चे १८.१० वाजता दरम्यान यातील मृतक कु. अंजली मिलींद पटले वय ९ वर्ष, रा. वारपिंडकेपार ही दिंनाक १०/०७/२०१८ ला सालई फाटा जवळ दुकानात खाऊची पुडी घेवुन रस्ता ओलांडीत असता खापा कडुन रामटेक कडे जाणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने चालवुन मृतक हीला खापा ते रामटेक रोड काटेबाम्हणी येथे धडक मारुन गंभिर जखमी करुन पळुन गेल्याने जखमीचे सामान्य रुग्नालय भंडारा येथे उपचारादरम्यान मृत्यु झाल्याने मर्ग क्र. २१/१८ कलम १७४ जाफौचे चौकशी अहवाला वरुन अज्ञात आरोपी वाहन चालका विरुध्द सरतर्फे फिर्यादी पोहवा. माहुर्ले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३०४(अ)भादंवि. सहकलम १८४,१३४(अ)(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जटाळ पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी : –**

दिनांक १५/०६/०१८ चे १२.४० यातील फिर्यादी सौरभ धनिराम खराबे वय २४ वर्ष रा. समर्थ नगर लाखनी याची निळसर सिल्व्हर प्लस मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी २५८६ किंमती ३०,०००/–रु. ची मित्र श्रेयश डोंगरे रा. बापु नगर लाखनी यांचे घराचे गेट समोर लॉक न करता ठेवली असता कोणतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधु न चोरुन नेल्याने फिर्यादी सौरभ धनिराम खराबे वय २४ वर्ष, रा. समर्थ नगर लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.हेमणे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**४) लोखंडी काता हातात मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक १५/०७/२०१८ चे २३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे प्रमोद बॉर चे कॉउंटरवर बसला असता यातील आरोपी व त्याचे सोबत असलेले २ इसम यांना दारु पिल्याचे १४६५/–रु. चे बिल मागीतले असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत भांडण करुन भांडणात आरोपी राधे भोंगाडे यांनी पाठीमागुन एक लोखंडी छुरा (काता) प्लॉस्टीक मुठ असलेला अंदाजे किंमती ८०/–रु. चा काढुन फिर्यादीस मारीत असतांना त्याचे हातातुन फिर्यादीने छुरा हिसकावुन घेतले असे फिर्यादी रामराज शालीकराम सार्वे वय १९ वर्ष रा. रजनी नगर खात रोड भंडारा प्रमोद बार जिप. चौक भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४/२५आर्म अक्ट सहकलम ३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चुटे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध जनावरे कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक १६/०७/२०१८ चे ०२.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक मध्ये १८ नग म्हैस व हल्ले (रेडे)किंमती १,८०,०००/–रु. चे अपु–या जागेत जनावरांना त्रास होईल अशा रितीने कोंबुन अवैध रित्या वाहतुक करतांना मिळुन आले त्याचे पासुन जनावरे व ट्रक असा एकुण किंमती ११,८०,०००/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बोरकर यांचे तोंडी पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ११(१)(घ)(ज)प्रा. कृ. वा. प्रति. का. सन १९६० सहकलम ११९,८३ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. ताराम पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन लाकडी पाटीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक १६/०७/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी साळा रोशन जुडालाल लांजेवार वय २५ रा. नेहरु वार्ड मुजबी यास यातील आरोपीतांनी संगनमत करुन त्याचे घराचे भिंती जवळ विट्टा लावु नको असे बोलुन शिवीगाळ, भांडण करुन लाकडी पाटीने डोक्यावर मारुन तसेच फिर्यादी व फिर्यादीचे दोन्ही साळयांना थापडबुक्यांने मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी रामस्वरुप बच्छेलाल पगारे वय ३६ वर्ष रा. नेहरु वार्ड मुजबी यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक १६/०७/२०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी खाली प्लॉटवर आरोपीच्या मुली 'शौच्यास कडे बसत असता फिर्यादीने हटकले' वरुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस व फिर्यादीचे पतीस घराचे बाहेर निघ! असे म्हणुन घरासमोरील रोडवर येवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**८) इसमाचा मृत्यु : –**

दिनांक १६/०७/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील मृतक मधुकर एकनाथ लंजे वय ३८ वर्ष, रा. पिंडकेपार हा खैरी शेत शिवारातुन घराकडे जात असतांना धुऱ्यांवरुन पडला त्यादरम्यान त्यास सरकारी दवाखाना साकोली येथे औषधोपचाराकरिता आनले असता डॉ. नी तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी एकनाथ गोविंदा लंजे वय ६५ वर्ष, रा. पिंडकेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लेंडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक १६/०७/२०१८ चे ११.०० ते ११.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मेघा ऑटो ही भिलेवाडा चौक जवळ करचखेडा येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भुरले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. लांडे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**ब)** दिनांक १६/०७/२०१८ चे १२.५० ते १३.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनी डोअर गाडी ही भिलेवाडा रोड टोल नाका येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भुरले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/०७/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो ही साकोली येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/०७/२०१८ चे १७.०० ते १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मारोती ओमनी ही बावणकर चौक येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. वडीकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. वडीकर पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**१२) दारूच्या नशेत वाहन चालवीतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद–**

दिनांक १६/०७/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यील पझीरो कार ही मद्य प्राशन करुन नागपुर नाक कडे जात असतांनी मिळुन आल्याने त्याचे जात असतांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. भुते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. दुधकवरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१३) अवैध देशी दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १६/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी अवैध देशी दारु /जुगार अडड्यांवर धाडी_घालुन पोलीस स्टेशन आंधळगाव व भंडारा येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २ लिटर ५२० मिलीलीटर देशी दारू किंमती ७२८/ रु. तसेच जुगारातुन किंमती २,०८८/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १६/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवाशी– ०२ तीन सिटर वाहनाकरीता– ०८ ईतर वाहनांवरती – ४८ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.